# महाराष्ट्र शासन

## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :-प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०११०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

दुरध्वनी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com


| | |
|---|---|
| क्र.महसुल/जमिनबाब/कावि-१५३/२०२६ | दिनांक : /०९/२०२६ |

मिरा - भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आ. क्र.........
दाखल ता....24/09/2026......
आयुक्त
मि. भा म.न.पा

प्रति,
मा. आयुक्त,
मिरा भाईदर महानगरपालिका

**विषय** : जाहीरनामा प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** : मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसुल/क-१/टे-२/कावि-E-९६२६६९२ दि. २७/०८/२०२६.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करणेत येते की, महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. जमीन २०१८/प्र.क्र.३८/ज-१, दि. २५/०७/२०१९ अन्वये धर्मदाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भातील कार्यपध्दती विहित करण्यांत आलेली आहे. त्यान्वये मौजे नवघर, ता. जि. ठाणे येथील जुना स.नं. ४४१, नविन स.नं. ११४ या आ.क्र.१९१ "Education Amenity" (E.A.) या आरक्षणामध्ये अंतर्भुत जमिनीवर शैक्षणिक सुविधा उभी करण्याच्या अनुषंगाने सदर जमीन प्रदान करण्यासाठी व्यक्ती /संस्था यांचेकडुन निविदा मागविणेकामी जाहीरनामा काढणेत आलेला आहे.

तरी सदर जाहीरनामा आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येवून तसा प्रसिध्दी अहवाल इकडिल कार्यालयास मिळणेस विनंती आहे.

(निलेश गौड)
**अपर तहसिलदार मिरा भाईदर**

प्रत : मंडळ अधिकारी भाईदर/ ग्राम महसुल अधिकारी सर्व

२/- सदर जाहीरनामा आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा प्रसिध्दी अहवाल इकडिल कार्यालयात सादर करावा.

# // प्रेस नोट //

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. जमीन २०१८/प्र.क्र.३८/ज-१, दि. २५/०७/२०१९ अन्वये धर्मदाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भातील कार्यपध्दती विहित करण्यांत आलेली आहे. त्यान्वये मौजे नवघर, ता. जि. ठाणे येथील जुना स.नं. ४४१, नविन स.नं. ११४ या जागेत मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भागसोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली होती. सदरची विकास योजना सुधारीत करणेकामी कार्यवाही करुन ती शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आली असता ती शासनाने दि. १६/०४/२०२६ रोजी सारभुत स्वरुपाचे बदल (EP) वगळून मंजुर केली असुन, सदर दि. १६/०४/२०२६ च्या मंजुर विकास योजनेनुसार मौजे नवघर येथील स.क्र.४४१ (जुना) ११४ (नविन) ही जागा १८.०० मी. रुंद विद्यमान रस्ता तसेच भागशः आ.क्र.१९१ "Education Amenity" (E.A.), व १९२ "Skill Development Centre" (SDC) या आरक्षणामध्ये अंतर्भुत आहे. आ.क्र.१९१ "Education Amenity" (E.A.) नुसार सदर जमिनीवर शैक्षणिक सुविधा उभी करण्याच्या अनुषंगाने सदर जमीन प्रदान करण्यासाठी व्यक्ती /संस्था यांच्या पात्रतेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे निश्चित करुन सदरची प्रेसनोट प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसात अर्ज मागविणेत येत आहेत.

१. मौजे नवघर, ता. जि. ठाणे येथील जुना स.नं. ४४१, नविन स.नं. ११४ या जागेत आ.क्र.१९१ "Education Amenity" (E.A.) या प्रयोजनाकरिता नविन आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर जमिनीवर आरक्षणाशी सुसंगत अशा शैक्षणिक या प्रयोजनासाठी व्यक्ती/संस्था यांना खालील अटी व शर्तीस अधीन राहून प्रदान करण्यात येईल.

२. अर्जदार सार्वजनिक धर्मदाय ट्रस्ट/न्यास अथवा सोसायटी नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था असावी.

३. सहभागी होणा-या संस्थेचे नाव भारतामध्ये कामकाज करण्यासाठी काळया यादीत दाखल झालेले नाही, याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. सदरील शासकीय जमीन मिळणेबाबत अर्ज करु इच्छिणारी संस्था किंवा संस्थेच्या विश्वस्तांना शैक्षणिक क्षेत्रामधील अनुभव असावा.

५. आर्थिक दृष्टया दुर्बल/वंचित व अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नती/विकासाच्या उद्देशाने स्थापन असणा-या संस्थेस प्राधान्य राहील.

६. सदरील जागेचा मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कारणासाठी वापर होणार नाही याची खबरदारी प्रतिग्रहिताने घ्यावी.

७. सदरील जमीन शासनाच्या मालकीची असल्याने, भूधारण पध्दती सरकार असल्याने. सदरील जमिनीचे अथवा जमिनीच्या कोणत्याही भागाचे शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय हस्तांतरण, विक्री, तारण, अदलाबदल अथवा गहाण न करण्याच्या अटीवर सदरील जमीन प्रदान करण्यात येईल.

८. सदरील जमीन मिळणेबाबत अर्ज करु इच्छिणारी व्यक्ती/संस्था यांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव, अर्हता, आर्थिक क्षमता, प्रदीर्घ काळासाठी सुविधा सुरळीत सुरु ठेवण्याची क्षमता इत्यादी बाबत सबळ पुरावे आवेदनासोबत संलग्न करणे बंधनकारक राहील.

९. सदर जागा प्रदान केल्यापासून तीन वर्षात विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वापर सुरु करणे बंधनकारक राहील.

१०. सदरील जमीन मिळणेबाबत अर्ज करु इच्छिणारी व्यक्ती /संस्था यांनी सदर शासकीय जागेच्या वापराबाबत प्रकल्प अहवाल व आराखडा सोबत जोडणे बंधनकारक राहील.

११. सदरील जमीन वापराबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रदान करण्यात येईल.

१२. महाराष्ट्र सरकारी जमिनीच विल्हेवाट लावणे, नियम, १९७१ चा नियम क्र. ५१ नुसार आवश्यक तेथे झाडे लावणे आवश्यक असून, त्यांचे संगोपन करणे प्रतिग्रहितांवर बंधनकारक राहील.

१३. उक्त जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात हक्कासंबंधी वाद निर्माण झाला किंवा नमूद अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास, अथवा सादर केलेली कागदपत्र खोटी असल्याचे आढळून आल्यास दिलेले आदेश रद्द करण्यात येईल.

१४. जमिनीखालील सर्व खाणी, खनिज, पदार्थ, दगड, माती यावरील शासनाचे अधिकार राखून ठेवले असून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार दगड/ माती इतर गौण खनिजाच्या खाणीचे काम करण्यासाठी अथवा त्यांचा शोध घेण्यासाठी सर्व वाजवी सोयीसह त्या ठिकाणापर्यंत पोहोचण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य शासनास राहील.

१५. जमिनींचा ताबा देण्यापूर्वी आदेशातील सर्व अटी शर्ती मान्य असल्याबाबत प्रचलित धोरण/ शासन निर्णयानुसार विहीत नमुन्यातील नोंदणीकृत करारनामा करुन देणे प्रतिग्रहितावर बंधनकारक राहील.

१६. करार झाल्यानंतरही दुस-या काही अटी व शर्ती लागू कराव्यात, असे शासनाला/ जिल्हाधिकारी यांना वाटल्यास तसे करण्याचे स्वातंत्र्य राहील, त्या अटी व शर्तीचे पालन करणे प्रतिग्रहिता यांच्यावर बंधनकारक असेल.

१७. जमीन प्रदानाच्या इतर अटी शर्ती महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांचे तरतुदीनुसार असतील, प्रचलित शासन निर्णय व आदेशातील अटी शर्ती यापैकी कोणत्याही बाबतीत शर्तभंग झाल्यास कोणतीही नुकसानभरपाई न देता शासनास सदर जमिनीचे पुनर्ग्रहण करण्यात येईल.

१८. प्रस्तुत शासकीय गुरचरण जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी संबंधित संस्थेस प्रदान करण्यापूर्वी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २२ अ नुसार त्यांच्याकडून विषयांकित जमिनीच्या बदल्यात त्याच गावातील दुप्पट क्षेत्राची व मुल्यांकन शासकीय गुरचरण जमिनीपेक्षा कमी असणार नाही अशी पर्यायी जमीन शासनास हस्तांतरित करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. तसेच सार्वजनिक विकासाच्या प्रकल्पांना गती मिळण्यासोबतच पर्यावरणाचा समतोल आणि स्थानिक समुदायांचे चराईचे हक्क प्रभावित होणार नाहीत या बाबत संबंधित संस्थेकडून हमीपत्र घेण्यात यावे.

१९. सदर जमिनीचा ताबा दिल्यानंतर/ प्रदान केल्यानंतर सदर जमिनीवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही. याची जबाबदारी प्रतिग्रहिताची राहील.

२०. सदर जमिनीस शासन निर्णय क्रमांक जमीन २०२१/प्र.क्र.४५/ज-१ दि. १४.०७.२०२१ च्या तरतूदी लागू राहतील.

२१. सदर शासकीय जमीन ही वरील सर्व अटी व शर्तीचे अधीन राहून देण्यात येणार असल्याने सदरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास अथवा उल्लंघन झाल्यास शर्तभंग म्हणून सदरील जमीन ही शासन जमा करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

२२. बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील इतर संस्थांना बंधनकारक असणा-या अटी व शर्ती संबंधित संस्थेवरही बंधनकारक राहतील.

२३. वरील सर्व अटी शर्तीचे अधीन राहून सदरील जमीन अट क्रमांक ०१ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे काम करणा-या व्यक्ती / संस्था यांना शासनाच्या मान्यतेने प्रदान करण्यात येणार आहे.

२४. जिल्हाधिकारी, ठाणे यांना योग्य वाटतील त्या अन्य अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा अधिकार राहील.

२५. महसूल व वन विभागाव्दारे निश्चित करुन देण्यात आलेल्या अटी/ शर्तींचे काटेकोरपणे पाल करणे बंधनकारक राहील.

अपर तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर, ता. जि. ठाणे
सत्यमेव जयते

(निलेश गौंड)
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**